
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | गुरुवार, 28 मे 2026 | अंक क्र. 25 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# बीड जिल्हा भाजपच्या प्रशिक्षण वर्गाचा थाटात समारोप

## सामान्य माणसाचे हित डोळ्यासमोर ठेवूनच केंद्र व राज्य सरकार विकासाच्या योजना यशस्वीपणे राबवत आहे : ना. पंकजाताई मुंडे ; मोदी, फडणवीस सारखे कुशल नेते लाभल्याने पक्षाला मोठे यश मिळाले



## डॉ.प्रितमताई मुंडेंनी केले सविस्तर मार्गदर्शन

■ मुंबई वृत्तसंस्था

गरीब व गरिबीची जाण असणारे पंतप्रधान आपल्या देशाला लाभले आहेत आणि याचमुळे केंद्र व राज्य सरकार सामान्य माणसाला समोर ठेवून आज विकासाच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत विकासाचे लाभ पोहोचले पाहिजेत यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडणवीस सारखे कुशल नेते लाभले असल्यामुळे पक्षाला फार मोठे यश मिळाले आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत बीड जिल्हा भाजपच्या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचा समारोप आज रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला, समारोपाच्या शेवटच्या सत्रात "केंद्र आणि राज्य सरकारच्या जन कल्याणकारी योजना" या विषयावर पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि तरूणांच्या हिताच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित असल्याचे सांगत विविध कल्याणकारी योजनांचा लेखाजोखा आपल्या भाषणात मांडला. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, मी लहानपणापासूनच भाजपच्या संस्कारात वाढले. माझ्या नावातच भाजपचे कमळ आहे. लोकनेते मुंडे साहेबांमुळे अटलजी, आडवाणीजी सारख्या नेत्यांना जवळून अनुभवता आले. मुंडे साहेब मला सगळीकडे घेऊन जायचे, त्यांनी पक्षाला वाडी, वस्ती, तांड्यापर्यंत घेऊन जाण्यासाठी जे कष्ट घेतले त्यामुळे आज चांगले दिवस आपण पहात आहोत. मुंडे साहेबांनी जे स्वप्न पाहिले होते, त्या स्वप्नांना सरकारी योजनांच्या स्वरूपात मी आणले. हे काम माझ्या एकट्याचे नव्हते तर पक्ष आणि नेतृत्व माझ्या मागे उभे असल्याने हे शक्य झाले. जलयुक्त शिवार, मुख्यमंत्री ग्रामसडक, बचतगटांना शुन्य टक्के दराने कर्ज अशा कितीतरी योजना चांगल्या रितीने राबवू शकले.



### मोदींचा विचार जाती धर्माच्या पलिकडे

■ पंतप्रधान मोदी यांनी जातीधर्माच्या पलिकडे जाऊन सामान्य माणसाचा विचार केला. सामान्यांच्या जीवनात आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना, पीएम किसान सन्मान योजना, मोफत अन्न धान्य अशा कितीतरी योजना सांगता येतील,ज्यात गरीबाचा विचार केला आहे. मोदीजी, देवेंद्रजी सारखे कुशल नेतृत्व लाभल्याने पक्षाला आज फार मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या संस्कारातून पक्षाला भविष्यात आणखी मजबूत करण्याचा संकल्प आपण सर्वजण करूया असे आवाहन याप्रसंगी केले.

### डॉ.प्रितमताई मुंडे यांचे मार्गदर्शन

■ आजच्या सत्रात "कार्यपद्धती" या विषयावर माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्ता आधारित आणि विचारधारेवर चालणारा तत्वनिष्ठ पक्ष आहे. आपला पक्ष एका विशिष्ट 'कार्यपद्धतीने' वाटचाल करतो आहे. संघटन,संपर्क, जनभावना आणि पक्षशिस्तीस अनुरूप आपली कार्यपद्धती असून याचा अवलंब सर्वांनी करावा असे आवाहन त्यांनी केले.

### ताईंनी घेतली पदाधिकाऱ्यांची काळजी

■ प्रशिक्षण वर्गास दोन्ही दिवशी ना. पंकजाताई मुंडे व डॉ.प्रितमताई मुंडे पूर्णवेळ उपस्थित होत्या, त्यामुळे पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह होता. शिबीरात सर्वांची चहा, नाश्ता, निवास, भोजनाची व्यवस्था योग्य झाली की नाही, याची त्यांनी स्वतः आस्थेवाईकपणे प्रत्येकाला बोलून चौकशी केली. त्यांच्यासमवेतच नाश्ता, भोजन केले. सत्राचा समारोप झाल्यानंतर सर्व सुखरूप पोहोचा, सावकाश जा असा काळजीचा सल्लाही दिला. आ. नमिता मुंदडा, माजी आमदार बदामराव पंडित, प्रवक्ते नवनाथ बन, राम कुलकर्णी, बाळदादा पवार, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नवनाथ शिराळे, माधव निर्मळ, संतोष हंगे, विजय गोल्हार यांसह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.a



# श्री. योगेश्वरी मंदिरात 'ज्ञानप्रसादालय' ग्रंथालयाचे उद्घाटन रोटरी क्लब व श्री.योगेश्वरी देवल कमिटी यांचा उपक्रम

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

"बुके नको, पुस्तक द्या" या अभिनव संकल्पनेतून अंबाजोगाईत साकारलेल्या 'ज्ञानप्रसादालय' या ग्रंथालयाचे उद्घाटन शनिवारी श्री योगेश्वरी मंदिर परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाले.अंबाजोगाई पुस्तकांचं गावं या उपक्रमात सहभाग नोंदवत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व श्री. योगेश्वरी देवल कमेटी यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे होते.तर उद्घाटक म्हणून देवल कमिटीचे सचिव गिरधारीलालजी भराडिया, रोटरीचे उपप्रांतपाल प्रवीण देशपांडे, प्रांतसचिव डॉ. राजगोपाल तापडिया,

देवल कमिटीचे विश्वस्त कमलाकर चौसाळकर,उल्हास पांडे, हंसराज देशमुख, प्रवीण दामा, पूजा कुलकर्णी,गौरी जोशी, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी, प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर, सहप्रकल्प प्रमुख धनराज सोळंकी,सौ. संगीता लातुरे, शर्मिष्ठा देशपांडे, मंचावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गिरधारीलाल भराडिया म्हणाले की मंदिरात येणाऱ्या भक्तांसाठी महाप्रसाद व ज्ञानप्रसाद या दोन्ही गोष्टी मिळणार आहेत. हे ग्रंथालय सुसज्ज व अत्याधुनिक करून भक्तांना इथे अंबाजोगाईच्या इतरही पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येणार आहे. आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलताना सुधीर लातुरे म्हणाले की वाचन संस्कृती टिकली तरच खऱ्या अर्थाने प्रगतीची दिशा साध्य होईल. हा मंदिरात सुरू झालेला उपक्रम प्रेरणादाई असल्याचे ते म्हणाले. यावेळी प्रवीण देशपांडे, प्रा. रोहिणी पाठक,यांनी मनोगत व्यक्त केले.दीपप्रज्वलन व फित कापून 'ज्ञानप्रसादालय' या ग्रंथालयाचे उद्घाटन झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख अविनाश मुडेगावकर यांनी केले. संचलन सुरेखा काळे, शिल्पा सेलुकर यांनी तर उपस्थितांचे आभार धनराज सोळंकी यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**बुकेऐवजी पुस्तकांच्या भेटीतून साकारले ज्ञानप्रसादालय**

■ **पत्रकार अविनाश मुडेगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या पुढाकाराने वाढदिवसा निमित्त बुके नको बुक द्या. या राबवलेल्या उपक्रमातून १ हजार पुस्तके जमा झाली होती. या ग्रंथसंपदेचे रूपांतर आता ज्ञानप्रसादालयात झाले आहे.**

# नाशिक कुंभमेळा कामांना मिळणार गती, कुंभमेळ्यासाठी ६,१६२ कोटींच्या कामांना मंजूरी

■ नाशिक वृत्तसंस्था

: आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जात आहे. कुंभमेळ्यात भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी कोट्यवधींच्या कामांचा धडाका नाशिक महापालिकेने लावला आहे. दरम्यान, कुंभमेळ्यासाठी ६,१६२ कोटींच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे विकास कामांना अधिक गती मिळेल.

### 'ही' कामे मार्गी लावली जाणार

कुंभमेळ्यासाठी मंजूर झालेल्या ६,१६२ कोटींच्या कामांमध्ये प्रामुख्याने घाट बांधणी, जोडरस्ते, रिंगरोड, जलशुद्धीकरण केंद्र, सीसीटीव्ही बसविणे, पूल बांधणी, पावसाळी गटाराची कामे, विद्युत वाहिन्या, ऑप्टिकल फायबर पाईप टाकणे, वाढीव पाणीपुरवठा आदी ६८ प्रकारची कामे मार्गी लावली जाणार आहेत. नाशिक विधान परिषद निवडणुकीची चुरस वाढली, आतापर्यंत 'इतक्या' उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल

नाशिक : स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधान परिषदेवर 17 सदस्यांची निवड होणार आहे. आमदार म्हणून विधान परिषदेवर जाणारे हे 17 सदस्य कोण असतील? त्यासाठी ... कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकवरील पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आरोग्य सुविधा, विद्युत पुरवठा, सुरक्षा व्यवस्था आदी पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर ताण येणार आहे. त्याकरिता नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडून कुंभमेळ्याकरिता दोन टप्प्यांमध्ये ६८ पायाभूत सुविधा प्रकल्पांचे प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आले होते.

यात वाहतुकीच्या नियोजनाकरिता रेल्वे, महामार्गाला जोडणारे रस्ते प्रामुख्याने बांधले जाणार आहेत. याशिवाय गोदावरीच्या घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरूस्ती केली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये येणाऱ्या वाहनांचे नियोजन करण्याकरिता अनेक ठिकाणी वाहनतळ उभारली जाणार आहेत. या वाहनतळांना प्रमुख ठिकाणांशी जोडणारे रस्ते विकसित केले जातील.

घाट बांधणी आणि दुरूस्तीकरिताही मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे. मुकणे धरणावरील पंपिंग स्टेशनची क्षमता वाढविण्याकरिता व जलशुद्धीकरणाकरिता सुमारे ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर सुरक्षेकरिता सर्वत्र बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही यंत्रणेकरिता सुमारे ३७२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### ओझर विमानतळासाठी ५७२ कोटी

नाशिकमधील ओझर विमानतळ विकासाकरिता ५७२ कोटी खर्चण्यात येणार आहेत. तर त्र्यंबकेश्वर परिसरातील पाणीसाठे पूर्णपणे भरण्याकरिता आणि गोदावरी नदी कायमस्वरूपी प्रवाहित राहण्याकरिता गौतमी गोदावरी धरण ते त्र्यंबकेश्वर उपसा प्रणाली योजनेकरिता सुमारे ३२९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. बहुतांश कामे नाशिक महानगरपालिका, त्र्यंबकेश्वर नगरपालिका, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआयडीसीच्या माध्यमातून केली जाणार आहेत.

लोकजागर

■ १] नोंद

## पदमजी पेपरतर्फे हरित प्रकल्प पूर्ण

पदमजी पेपर प्रॉडक्ट्सने २०२५-२६ या वित्तीय वर्षात ८०७.८८ कोटी रुपयांचा महसूल मिळवून आपल्या कामगिरीत स्थिरता राखली आहे; गेल्या वर्षी कंपनीने ८०९.०८ कोटी रुपयांचा महसूल मिळविला होता. या स्थिर कामगिरीचे मुख्य कारण म्हणजे कंपनीच्या कागद विक्रीत १,६७५ मेट्रिक टनांनी वाढ झाली आहे. उत्पादनात झालेल्या खर्चाच्या बचतीचा लाभ थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि बाजारातील आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी कंपनीने प्रति मेट्रिक टन सरासरी विक्री किंमतीत कमी केली. मजबूत कार्यक्षमतेच्या जोरावर कंपनीने दोन्ही आर्थिक वर्षांत आपला ईबीटडा मार्जिन १८ टक्क्यांवर स्थिर राखले आहे.कंपनीने ११० कोटी रुपयांचा भांडवली खर्च योजना यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. या गुंतवणुकीचा वापर सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे, प्रगत एएफबीसी बॉयलरची उभारणी करणे आणि कार्यक्षमता सुधारण्यासाठी कागद तयार करणाऱ्या तीन यंत्रांच्या महत्त्वाच्या भागांचे आधुनिकीकरण करणे या कामांसाठी करण्यात आलेला आहे. सोलापूरजवळील भाळवणी येथे १५.४ मेगावॅट क्षमतेचा नवीन सौर ऊर्जा प्रकल्प डिसेंबर २०२५ मध्ये कार्यान्वित झाला आहे. हा प्रकल्प कंपनीच्या वार्षिक विजेच्या गरजेच्या सुमारे ३५ टक्के गरज पूर्ण करणार आहे. यामुळे उत्पादनासाठी लागणारा विजेचा खर्च कमी होईल. तसेच, यामुळे दरवर्षी अंदाजे २७,००० मेट्रिक टन इतके कार्बन उत्सर्जन कमी होण्यास हातभार लागणार आहे. नियामक नियमांमधील बदलांमुळे, महाड येथील आपल्या आगामी प्रकल्पाच्या उभारणीसाठी कंपनी सध्या नवीन पर्यावरण मंजुरी मिळवण्याकरिता अर्ज करत आहे. पॅक केलेल्या वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी बाह्य वातावरणापासून संरक्षण देणारे गुणधर्म असलेला 'बॅरियर प्रॉपर्टीज', निसर्गात सहज विरघळणाऱ्या बायोडिग्रेडेबल आणि विघटनशील अशा विशेष कागदांच्या (स्पेशॅलिटी पेपर्स) उत्पादनावर कंपनीने आपला भर कायम ठेवला आहे.

PUDUMJEE PAPER PRODUCTS LIMITED

PUDUMJEE

■ २] शून्यातून विश्व

## ९ वी पास तरुण व्यवसायात करतोय लाखोची उलाढाल




अलिकडच्या काळात अनेक तरुण विविध प्रकारचे व्यवसाय करुन मोठा नफा मिळवत आहेत. काहीजण नोकरी सोडून देखील यशस्वी व्यवसाय करत आहेत. तर कमी शिक्षण झालेले तरुण देखील यशस्वी व्यवसाय करताना दिसत आहेत. आज आपण अशाच एका तरुणाची यशोगाथा पाहणार आहोत. या तरुणाने 9 वी शिक्षण घेऊनसुद्धा व्यवसायाच्या माध्यमातून भरारी घेतली आहे. कृष्णदेव रोकडे असं सोलापूरच्या या तरुणाचं नाव आहे.

सोलापूरच्या कृष्णदेव रोकडे यांनी 500 रुपयांपासून स्वीट कॉर्न विकण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. आज ते दरमहा 40 ते 45 हजार रुपये कमावत आहेत. रोकडे हे दर वर्षाला या व्यवसायातून 13 ते 14 लाख रुपये कमावत आहेत. ज्यामुळं तरुणांना प्रेरणा मिळत आहे. आजकाल अनेत तरुण वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवसायात नशीब आजमावत आहेत. यापैकी काही व्यवसाय आधीच बाजारात आहेत आणि काही नवीन आहेत. परंतु असे काही लोक आहेत जे कठीण आणि आव्हानात्मक व्यवसाय निवडतात आणि त्यात यश मिळवतात. सोलापूर जिल्ह्यातील कृष्णदेव रोकडे यांनीही असाच व्यवसाय निवडला आहे. त्यांनी स्वीट कॉर्न विकण्याचा व्यवसाय सुरू केला आणि आज ते या व्यवसायातून ते लाखो रुपये कमवत आहेत.

कृष्णदेव मधुकर रोकडे हे पंढरपूर तालुक्यातील तुंगत गावचे रहिवासी आहेत. त्यांचे शिक्षण 9 वी पर्यंत झाले आहे. परंतु त्यांचा संघर्ष आणि मेहनतीनं त्यांना यश मिळवून दिलं आहे. 2012 मध्ये कृष्णदेव यांनी अवघ्या 500 रुपयांमध्ये स्वीट कॉर्न विकण्याचा व्यवसाय सुरू केला होता. सुरुवातीला त्याला ग्राहकांचा अत्यल्प प्रतिसाद मिळाला, पण त्याने हार मानली नाही. हळूहळू स्वीट कॉर्न खाणाऱ्यांची संख्या वाढू लागली आणि त्यांचा व्यवसायही विस्तारू लागला. आज कृष्णदेवचा स्वीट कॉर्नचा व्यवसायसोलापूर, मोहोळ, पंढरपूर, अंगार, कामठी आणि कुरुलपर्यंत पसरला आहे. लोक त्यांच्या शंभूराज ब्रेकफास्ट सेंटरमध्ये स्वीट कॉर्न चाखण्यासाठी येतात. 500 रुपयांपासून सुरू झालेल्या या व्यवसायातून त्यांना आता दरमहा 40 ते 45 हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. प्रथम एका हॉटेलपासून व्यवसाय सुरू करणाऱ्या कृष्णदेव यांनी आता एकाच हॉटेलमध्ये तीन हॉटेल्स बांधली आहेत. तिन्ही हॉटेलमध्ये स्वीट कॉर्न विक्रीचे काम सुरू आहे. या तिन्ही हॉटेलमधून ते दरवर्षी 13 ते 14 लाख रुपयांचा व्यवसाय करत आहेत.

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे

# डॉ.पुरुषोत्तम भापकर यांची अध्यक्षपदी निवड



सुप्रसिद्ध सनदी अधिकारी व महाराष्ट्र शासनातील सचिव पदावरून सेवानिवृत्त झालेले कवी लेखक दिग्दर्शक डॉ. पुरुषोत्तम भापकर यांची अमरावती येथे होणाऱ्या चौथ्या स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे .हे स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन अमरावतीच्या डॉ.पंजाबराव देशमुख आयएएस अकादमी तर्फे मिशन आयएएस अंतर्गत अमरावती परतवाडा रोडवरील भव्य अशा सिकची रिसॉर्ट मध्ये संपन्न होणार आहे .यापूर्वी झालेल्या या तीन स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सर्वश्री महाराष्ट्राचे मुख्य सचिव व सुप्रसिद्ध सनदी अधिकारी व विदर्भाचे सुपुत्र श्री जे पी डांगे दुसऱ्या स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तत्कालीन महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे विशेष कार्यकारी अधिकारी श्री रवींद्र जाधव तर तिसऱ्या स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध सनदी अधिकारी व वयाच्या सुप्रसिद्ध अशा यशदाला मानद संचालक म्हणून कार्यरत असणारे हरिभक्त पारायण श्री रंगनाथ नाईकडे आय एफ एस यांची निवड झाली होती.

पहिले स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन हे अमरावतीच्या श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन मध्ये संपन्न झाले होते तर दुसरे स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन हे अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या गुरुकुंज मोझरी येथील स्मृतिभवन मध्ये संपन्न झाले होते तर तिसरे स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलन हे बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील कविवर्य श्रीपाद कृष्ण कोल्हटकर सभागृहात संपन्न झाले होते. या तीनही साहित्य संमेलनाला स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद प्राप्त झाला होता. स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळावी म्हणून हे संमेलन सातत्याने आयोजित केले जाते. या संमेलनातून विद्यार्थ्यांना योग्य ती दिशा प्राप्त होते. याशिवाय जेष्ठ सनदी अधिकाऱ्यांचे अनुभव मार्गदर्शन कवी संमेलन इत्यादी विविध उपक्रम या साहित्य संमेलनामध्ये राबविण्यात येतात.

श्री पुरुषोत्तम भापकर हे अमरावतीला जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत राहिले असून छत्रपती संभाजी नगर येथे महानगरपालिका आयुक्त विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत होते. त्यानंतर मंत्रालयामध्ये कार्यरत असताना ते सेवानिवृत्त झाले .एक कर्तव्यदक्ष तपस्वी तेजस्वी तत्पर सनदी अधिकारी म्हणून त्यांचा सर्वत्र नावलौकिक आहे. त्यांनी विविध पुस्तके लिहिली असून त्यांच्या जीवन कार्यावर पुरुषोत्तम हा चित्रपट देखील निघालेला आहे. श्री संत गाडगेबाबा यांच्या विचारांचे अनुकरण श्री भापकर हे आपल्या प्रत्यक्ष जीवनात करतात .म्हणूनच ज्या ज्या ठिकाणी त्यांचे नियुक्ती झाली त्या त्या ठिकाणी त्यांनी आपल्या कार्यालयाचा परिसर स्वतः साफ करण्यामध्ये पुढाकार घेतलेला आहे .त्यांची स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# निवडणुका जिंकणे आणि अर्थव्यवस्था मजबूत ठेवणे हे वेगवेगळे विषय : डॉ. भारत कऱ्हाड

लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणुका जिंकणे हे कोणत्याही राजकीय पक्षासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. निवडणुकीतील विजय हा जनतेचा विश्वास, नेतृत्वाची स्वीकारार्हता आणि राजकीय संघटनशक्ती यांचे प्रतीक असतो. मात्र केवळ निवडणुका जिंकणे म्हणजे देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे मजबूत झाली आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरत नाही. राजकारण आणि अर्थकारण हे एकमेकांशी संबंधित असले तरी त्यांचे परिणाम आणि मोजमाप वेगवेगळ्या निकषांवर होत असतात. एखादे सरकार जनतेमध्ये लोकप्रिय असू शकते, परंतु त्याच वेळी अर्थव्यवस्थेसमोर रोजगार, गुंतवणूक, उत्पादनक्षमता, महागाई किंवा असमानता यांसारखी गंभीर आव्हानेही उभी असू शकतात.

भारतात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर इन्फ्रास्ट्रक्चर विकास झाला आहे. देशभरात एक्सप्रेसवे, मेट्रो प्रकल्प, नवीन एअरपोर्ट्स, रेल्वे मॉडर्नायझेशन, बंदरांचा विकास आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी वाढ झाली आहे. डिजिटल पेमेंट व्यवस्था, यूपीआय प्रणाली आणि ऑनलाईन व्यवहार यामुळे भारताने जगात वेगळी ओळख निर्माण केली आहे. स्टार्टअप संस्कृतीला चालना मिळाली असून अनेक तरुण उद्योजक नव्या कल्पनांसह पुढे येताना दिसत आहेत. या सर्व गोष्टी देशाच्या आर्थिक क्षमतेचे सकारात्मक चित्र निर्माण करतात. भारत आज जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून वेगाने पुढे येत आहे. अनेक जागतिक आर्थिक संस्थांनी भारताच्या ग्रोथ रेट बाबत सकारात्मक अंदाज व्यक्त केले आहेत. काही क्षेत्रांमध्ये भारताने जागतिक स्तरावर प्रभाव निर्माण केला आहे. मोबाईल मॅन्युफॅक्चरिंग, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्मिती, सेवा क्षेत्र आणि संरक्षण उत्पादन यामध्ये भारताची भूमिका वाढताना दिसत आहे. त्यामुळे भारत आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे मागे जात आहे असे म्हणणे वास्तववादी ठरणार नाही. तथापि अलीकडच्या काळात काही अर्थतज्ज्ञ आणि तज्ञ मंडळींकडून केंद्र सरकारच्या अर्थनीतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यांच्या मते देशात इन्फ्रास्ट्रक्चर विकास वेगाने होत असला तरी रोजगारनिर्मिती अपेक्षित प्रमाणात होत नाही. मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्र अजूनही जागतिक स्पर्धेत पूर्ण ताकदीने उभे राहिलेले नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील ताण कायम आहे. काही तज्ज्ञ परकीय गुंतवणुकीतील चढ-उतार, वाढती आर्थिक असमानता, महागाईचा मध्यमवर्गावर होणारा परिणाम आणि लघुउद्योगांना भेडसावणाऱ्या अडचणी याकडे लक्ष वेधतात. काहींच्या मते आर्थिक धोरणांमध्ये मोठ्या प्रकल्पांना आणि कॉर्पोरेट क्षेत्राला प्राधान्य दिले जात आहे, तर दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांच्या खरेदी क्षमतेकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही अशी टीकाही केली जाते.



रोजगाराचा विषय हा आजच्या काळातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा मानला जातो. उच्चशिक्षित तरुणांची संख्या वाढत असताना गुणवत्तापूर्ण आणि स्थिर रोजगार त्याच प्रमाणात उपलब्ध होत आहेत का, हा गंभीर प्रश्न आहे. अनेक तरुण स्पर्धा परीक्षांच्या चक्रात अडकलेले दिसतात. काही जण अल्प वेतनाच्या कॉन्ट्रॅक्ट जॉब्समध्ये काम करतात, तर काहींना त्यांच्या शिक्षणाशी सुसंगत रोजगार मिळत नाही. बेरोजगारीचा प्रश्न केवळ आर्थिक नसून सामाजिक असंतोष निर्माण करणारा विषयही ठरू शकतो.

ग्रामीण भारताची परिस्थितीही अनेकदा चिंताजनक दिसते. शेतीवरील वाढते उत्पादन खर्च, हवामानातील अनिश्चितता, बाजारातील चढ-उतार आणि कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी वर्ग अनेक अडचणींना सामोरे जात आहे. शहरांमध्ये विकासाची गती वेगवान दिसत असताना ग्रामीण भागात आर्थिक संघर्ष कायम असल्याची भावना निर्माण होते. त्यामुळे विकासाचा लाभ सर्व स्तरांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत आहे का, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.

फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट म्हणजेच परकीय गुंतवणुकीच्या संदर्भातही मिश्र चित्र दिसते. भारताकडे मोठी बाजारपेठ, प्रचंड मनुष्यबळ आणि वाढती ग्राहकसंख्या आहे. त्यामुळे जागतिक कंपन्यांसाठी भारत आकर्षणाचे केंद्र ठरू शकतो. परंतु काही गुंतवणूकदारांना धोरणात्मक स्थिरता, प्रशासकीय प्रक्रिया, कम्प्लायन्स बर्डन आणि कर व्यवस्थेबाबत चिंता असल्याचे बोलले जाते. चीननंतर जागतिक उत्पादन क्षेत्रासाठी भारत मोठा पर्याय ठरू शकतो, परंतु त्यासाठी मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टम अधिक मजबूत करण्याची गरज आहे.

आजच्या काळात अर्थव्यवस्थेचे मूल्यांकन केवळ जीडीपी ग्रोथच्या आकड्यांवर करता येत नाही. देशातील नागरिकांची क्रयशक्ती, रोजगारनिर्मिती, उत्पन्नातील असमानता, आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योगांना मिळणारे वातावरण हे सर्व घटक महत्त्वाचे असतात. मोठे मॉल्स, उंच इमारती आणि वेगवान महामार्ग हे विकासाचे दृश्य प्रतीक असू शकतात, पण त्याच वेळी समाजातील काही घटक आर्थिकदृष्ट्या मागे राहत असतील तर त्या विकासाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होतात. महागाई हाही सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर परिणाम करणारा महत्त्वाचा विषय आहे. इंधन दर, अन्नधान्याचे भाव, शिक्षण आणि आरोग्य खर्च वाढल्यास मध्यमवर्ग आणि गरीब वर्गावर त्याचा थेट परिणाम होतो. अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे चित्र दिसत असतानाही नागरिकांच्या दैनंदिन जीवनात आर्थिक ताण जाणवत असेल तर सरकारसमोर मोठे आव्हान निर्माण होते. राजकीयदृष्ट्या मजबूत नेतृत्व जनतेमध्ये विश्वास निर्माण करू शकते. प्रभावी कम्युनिकेशन, वेल्फेअर स्कीम्स, प्रशासनातील दृश्यमान निर्णय आणि राष्ट्रीय अभिमानाशी संबंधित मुद्दे यामुळे जनतेचा पाठिंबा टिकून राहतो. अनेकदा जनतेला स्थिर सरकार आणि निर्णायक नेतृत्व अधिक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे आर्थिक प्रश्न असतानाही एखादे सरकार निवडणुका जिंकू शकते. इतिहासात अनेक देशांमध्ये असे चित्र दिसून आले आहे. परंतु कोणत्याही सरकारसाठी दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य निर्माण करणे हेच खरे आव्हान असते. निवडणूक विजय हा काही वर्षांचा असू शकतो, पण चुकीच्या आर्थिक धोरणांचे परिणाम अनेक दशकांपर्यंत जाणवू शकतात. म्हणूनच आर्थिक सुधारणा, उद्योगांना पोषक वातावरण, कौशल्याधारित शिक्षण, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण विकास यावर सातत्याने लक्ष देणे आवश्यक असते.

भारतातील परिस्थिती पूर्णपणे नकारात्मकही नाही आणि पूर्णपणे समाधानकारकही नाही. देश एका मोठ्या ट्रान्झिशनच्या टप्प्यातून जात आहे. एका बाजूला डिजिटल क्रांती, इन्फ्रास्ट्रक्चर ग्रोथ, तंत्रज्ञानाचा विस्तार आणि जागतिक स्तरावरील वाढता प्रभाव दिसत आहे, तर दुसऱ्या बाजूला बेरोजगारी, ग्रामीण संकट, मॅन्युफॅक्चरिंगमधील आव्हाने आणि आर्थिक असमानता यांसारखे प्रश्न कायम आहेत.

लोकशाहीमध्ये सरकारचे मूल्यांकन करताना केवळ निवडणूक निकाल किंवा केवळ आर्थिक आकडे यांवर अवलंबून राहणे पुरेसे नसते. देशाची खरी प्रगती तेव्हाच मानली जाईल जेव्हा विकासाचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचेल, रोजगाराच्या संधी वाढतील, ग्रामीण आणि शहरी भारतातील दरी कमी होईल आणि प्रत्येक नागरिकाला आर्थिक प्रगतीमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. राजकीय यश आणि आर्थिक यश यांच्यात संतुलन राखणे हेच कोणत्याही लोकशाही राष्ट्रासाठी दीर्घकालीन स्थैर्याचे खरे सूत्र ठरते.

■ — डॉ. भारत कऱ्हाड,
सामाजिक आणि राजकीय विश्लेषक, पुणे.




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# जिल्हाधिकारी कार्यालयात स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन

**अमरावती :** नुकत्याच संपन्न झालेल्या डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी अमरावतीच्या मिशन आयएएस अंतर्गत अमरावती जवळील वलगावच्या सिकची रिसॉर्ट मध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिरातील सर्व 129 शिबिरार्थींनी व अमरावती मिशन आय एएसच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट दिली. जिल्हाधिकारी श्री आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली या भेटीचे आयोजन केले होते. शिबिरार्थींनी जिल्हाधिकाऱ्यांचा कक्ष निवासी उपजिल्हाधिकारी यांचा कक्ष नियोजन भवन या ठिकाणी पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करण्यासाठी अमरावती जिल्ह्याच्या नियोजन अधिकारी



श्रीमती वर्षा भाकरे यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या भाषणामध्ये आपला स्पर्धा परीक्षेचा प्रवास व विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना कोण कोणती काळजी घेतली पाहिजे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिशनचे संचालक व सुप्रसिद्ध स्पर्धा परीक्षा तज्ञ प्रा.डॉ.नरेशचंद्र काठोळे हे होते. याप्रसंगी श्री रविराज देशमुख श्री मुनीराज कुथे श्री शंकर पत्रे श्री शांतीलाल महाजन श्रीमती विद्या काठोळे प्रा. पल्लवी येरुळकर श्री संजय काशीवार श्री गुलवाडे श्री हरीश यावले डॉ. हेमंत उर्फ बाळू भाऊ देशमुख श्री नंदकिशोर खडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. या कार्यक्रमात श्रीमती वर्षा भाकरे यांच्या व्यतिरिक्त प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे श्री रविराज देशमुख श्रीमती तेजस्विनी वानखडे यांनीही विद्यार्थ्यांना उदबोधन केले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणादायी वातावरण तयार झाले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी श्री संतोष काकडे यांनी पुढाकार घेतला .

जिल्हाधिकारी कार्यालय मार्फत सर्व शिबिरार्थींना जलपान करण्यात आले. नियोजन भवनातून बाहेर पडताना प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर जिल्हाधिकारी कार्यालय पाहिल्याचे समाधान दिसून येत होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक व त्यानंतर पोलीस आयुक्तालय या ठिकाणी भेटी दिल्यात. आयुक्तालयात पोलीस आयुक्त श्री राकेश ओला यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मला आयपीएस होण्यासाठी चार वेळा परीक्षा द्यावी लागली तुम्ही जर आतापासून प्रयत्न करीत आहात तर तुम्ही यशाचे मानकरी अल्पावधीमध्ये होऊ शकता असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. या शिबिराचे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी अमरावती प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट वलगाव व त्रिवेणी फाउंडेशन अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

## गेवराई पोलिसांची मोठी कारवाई

# स्विफ्ट कारसह ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त
# अवैध दारू वाहतूक करणारा आरोपी गजाआड

**गेवराई (प्रतिनिधी)**

आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश बीडचे पोलीस अधीक्षक मा. नवतीत कॉंवत यांनी दिले होते. या आदेशानुसार पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी विशेष पथक तयार करून गेवराई तालुक्यात अवैध धंद्यांविरुद्ध धडक मोहीम उघडली आहे. या मोहिमेतर्गत पोलिसांनी गेवराई शहरात मोठी कारवाई करत एका कारसह तब्बल ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई शहरातून एका स्विफ्ट डिझायर कारमधून अवैध दारूची चोरटी वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने गेवराई येथील सावता नगर चौकात सापळा रचून कारवाई केली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक: MH12QG7964) थांबवून तिची झडती घेतली असता, कारमध्ये ८,००० रुपये किमतीची देशी-विदेशी दारू अवैध रित्या वाहतूक करताना मिळून आली. पोलिसांनी दारूसाठा आणि स्विफ्ट कारसह एकूण ६,०८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी कारचालक आरोपी राम अश्रुबा कदम (वय ४५ वर्षे, रा. पंचायत समिती रोड, भिमनगर, ता.



गेवराई, जि. बीड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

सदरची धडक कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक मा. नवतीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तीडके, आणि उप विभागीय पोलीस अधिकारी (उप विभाग गेवराई) श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत गेवराईचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार, सपोनि. संतोष जंजाळ, पोह/९५४ अशोक हंबर्डे, पोकॉ/२१९८ धिरज खांडेकर, पोकॉ/१००१ महादेव कदम, पोकॉ/८१९ रामराजे काकडे व होमागार्ड १८५१ ढाकणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे गेवराईतील अवैध दारू विक्रेत्यांचे व वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहेत.

# युवकांनी स्पर्धा परीक्षेतून स्वतःचे करिअर घडवावे : जंबाजीराव भोसले




**भाटवडे /प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील युवकांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून स्वतःचे करिअर घडवावे, असे प्रतिपादन शिराळा पोलीस स्टेशनचे निरीक्षक जंबाजीराव भोसले यांनी केले.

शिराळा येथील स्पर्धा परीक्षेतून सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून निवड झालेल्या अंकिता सुभाष पाटील या प्राथमिक शिक्षिकेचा सत्कार करताना ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष राजकुमार पाटील होते.

यावेळी भोसले म्हणाले, स्पर्धा परीक्षा हे युवकांना करिअर घडवण्यासाठी मोठे माध्यम आहे. सातत्यपूर्ण प्रयत्न, प्रचंड कष्ट आणि चिकाटी असेल तर विद्यार्थ्यांना यात निश्चितच यश मिळू शकते.

यावेळी राजकुमार पाटील म्हणाले, अंकिता पाटील या शिराळा तालुक्यातील करमाळे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत नोकरी करत असताना सातत्यपूर्ण अभ्यासातून त्यांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मिळवलेले उज्वल यश समाजाला प्रेरणादायी आहे. प्रतिकूल परिस्थितीत तिने सातत्यपूर्ण अभ्यास आणि प्रचंड मेहनतीने हे यश संपादन केले आहे.

यावेळी उपक्रमशील शिक्षक उदय चव्हाण , चंद्रकांत गायकवाड आणि कुटुंबीय उपस्थित होते.

# पेट्रोल-डिझेलनंतर आता CNG दरांचा भडका:रिक्षा-टॅक्सी प्रवास महागणार ?

**मुंबई :** देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या दरांमुळे आधीच नागरिक त्रस्त असताना आता सीएनजीच्या दरवाढीने सर्वसामान्य वाहनधारकांची चिंता आणखी वाढली आहे. गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर वारंवार वाढल्यानंतर आता सीएनजीचे दरही भडकले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगरसह अनेक शहरांमध्ये सीएनजीच्या किंमतीत वाढ झाल्याने रिक्षा, टॅक्सी आणि खासगी वाहनांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनधारकांच्या मासिक बजेटवर मोठा परिणाम होणार असल्याचे चित्र आहे.

पुण्यात एमएनजीएल कंपनीने सीएनजीच्या दरात प्रति किलो 2 रुपये 50 पैशांची वाढ जाहीर केली आहे. त्यामुळे शहरातील सीएनजीचा दर 92 रुपये 25 पैशांवरून थेट 94 रुपये 75 पैशांवर पोहोचला आहे. वाढीव दर 27 मेच्या मध्यरात्रीपासून लागू करण्यात आले. इनपुट गॅसचा खर्च वाढल्यामुळे ही दरवाढ करावी लागल्याचे स्पष्टीकरण कंपनीकडून देण्यात आले आहे. या वाढीचा थेट परिणाम रिक्षा, टॅक्सी चालकांसह दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांवर होणार आहे. प्रवासखर्च वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला पुन्हा कात्री लागणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्येही सीएनजीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. शहरातील चिकलठाणा परिसरातील बीपीसीएल पंपावर सीएनजीचे दर किलोमागे 2 रुपयांनी वाढले आहेत. गेल्या 15 दिवसांत येथे सीएनजीच्या किंमतीत




12 रुपयांची वाढ झाल्याने वाहनधारक संतप्त झाले आहेत. शहरात सध्या पेट्रोलचा दर 112 रुपये 88 पैसे प्रति लिटर, तर डिझेलचा दर 99 रुपये 50 पैसे इतका आहे. पेट्रोल-डिझेलनंतर आता सीएनजीही महाग झाल्याने पर्यायी इंधनाचा फायदा कमी होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

नाशिकमध्येही सीएनजीच्या दरात वाढ झाली असून प्रति किलो 1 रुपया 35 पैशांची वाढ नोंदवली गेली आहे. त्यामुळे शहरात सीएनजीचा नवा दर 96 रुपये 50 पैसे प्रति किलो झाला आहे. यापूर्वी वाहनधारकांना 95 रुपये 15 पैशांमध्ये सीएनजी उपलब्ध होत होते. 28 मेपासून नवीन दर लागू करण्यात आले आहेत. आखाती भागातील युद्धजन्य परिस्थिती आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील इंधन दरवाढ याचा परिणाम आता सीएनजीवरही होत असल्याचे बोलले जात आहे.

**रिक्षा, टॅक्सी आणि कॅब सेवांचे भाडे वाढण्याची शक्यता**

दरम्यान, पेट्रोल, डिझेल आणि सीएनजी या तिन्ही इंधनांच्या वाढत्या दरांमुळे वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः रिक्षा, टॅक्सी आणि कॅब सेवांचे भाडे वाढण्याची शक्यता असल्याने सर्वसामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. सीएनजीचे दर झपाट्याने वाढत असल्यामुळे हे इंधनही लवकरच शंभरी पार करेल, अशी भीती वाहनधारक व्यक्त करत आहेत. सततच्या इंधन दरवाढीमुळे नागरिकांकडून सरकारने तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी केली जात आहे.

# वडवणी परिसरासह तालुक्याला वादळी वारा-पावसाचा तडाखा:आंब्यासह चिंचेचे झाडे उन्मळून पडली, आंबा पिकाचे नुकसान

**वडवणी :** शहरासह तालुक्यात मंगळवारी मध्यरात्री १२ ते १२:३० वाजण्याच्या दरम्यान विजांच्या कडकडाटासह जोरदार वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे व अंब्याचे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेकांच्या घरावरील पत्रे उडाली आहेत.

जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून पाऊस होत आहे. केजनंतर वडवणी तालुक्यात पावसाने तडाखा दिला. वादळामुळे आंबा पिके, जांभूळ, चिंच यांसारखी झाडे मुळासकट उन्मळून पडली. नागरिकांच्या घरावरील पत्रे उडाली आहेत. काही ठिकाणी गोठ्यावरील पत्रेही उडाली आहेत. त्यामुळे जनावरे जखमी झाली आहेत. अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले आहेत. वादळी वाऱ्यामुळे विद्युत पोल व तारा तुटल्या आहेत. त्यामुळे काल वीजपुरवठा खंडित झाला आहे. शेती पिकांचे, जनावरांचे तसेच ग्रामस्थांच्या निवाऱ्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गरीब व सर्वसामान्य नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे नागरिकांचे हाल झाले.

राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून दिले स्थानिक प्रशासनाला निवेदन महसूल व कृषी विभागामार्फत पंचनामे करून आर्थिक मदत देण्यात यावी व रस्त्यावर पडलेली मोठी झाडे हटवून वाहतूक सुरळीत करावी तसेच वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी



संबंधित विभागाला त्वरित सूचना द्याव्यात,अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प.) वतीने निवेदनात करण्यात आली आहे.हे निवेदन महादेव अंकुशराव जमाले पाटील, ॲड. भास्कर उजगरे, खलील भाई पठाण, सुरेश सावंत पाटील आदींच्या स्वाक्षरीने तहसीलदारमहिंद्रकर यांना दिले.

घरातही शिरले पाणी वडवणी शहरासह तालुक्यात २६ रोजी मध्ये रात्री साडेबारा वाजण्याच्या दरम्यान झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने अनेकांची झोप उडविली आहे.अचानक आलेल्या पावसामुळे कच्च्या घरावरील पत्रे तर उडाली परंतु पक्क्या घरातही खिडकी द्वारे पाणी शिरले.यामुळे शहरातील अनेकांनी रात्र जागूनच काढली. वादळी वाऱ्यात वीज गेल्याने कित्येकांची झोप उडवली.

आज यलो अलर्ट, २ जून पर्यंत आता पावसाचा इशारा दरम्यान, भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार आज २८ मे रोजी मेघगर्जनेसह पाऊस होणार आहे. त्यानंतर ३१ मे ते २ जून या कालावधीतही हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी मान्सूनपूर्व कामे हा अंदाज लक्षात घेऊन नियोजित करणे गरजेचे आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, गुरुवार 28 मे 2026
Last page

# ओंकार शुगर्सने फिरवली पाठ; ऊस बील प्रश्नी शेतकऱ्यांची दिशाभूल

**परळी / प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मुख्य आर्थिक स्त्रोत असलेल्या ओंकार शुगर युनिट क्र 8 पांगरीने मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊसाची देयक घोषित दरानुसार अदा करावीत या मागणीला घेत ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती लढा देत असून ओंकार कडून वारंवार आश्वासणाची बोळवण केली जात असल्याने समितीने या महिन्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार पूर्ण ऊस देयक शेतकऱ्यांच्या ख्याती वर्ग करण्यात यावी अशी मागणी निवेदनात द्वारे केली. ऊस देयक अदा न झाल्यास दि 1 जून पासून साखर कारखान्यासमोर बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला.

ओंकार शुगर्स कडून मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊस देयक प्रश्नी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती वेळोवेळी निवेदने, आंदोलने करत आलेली असून दि 8 मे रोजी केलेल्या बेमुदत सत्याग्रह आंदोलन प्रसंगी कारखाना प्रशासनाने दि 25 मे पर्यन्त घोषित केलेल्या 2950 रु प्रमाणे सर्व शेतकऱ्यांना ऊस देयक अदा करण्यात येतील असे लेखी अभिवचन देत 1800 रु वर्ग देखील केली.एकाच गळीत हंगामात सुरुवातीला 2950 दर पश्चात 1800 रुपये देयक दिली. मात्र मे महिना संपत आला तरी कारखाना प्रशासनाकडून घोषित



केलेल्या गाळप केलेल्या ऊसाबाबत शेतकऱ्यांना घोषित दरानुसार देयक अदा करण्याबाबत चालढकल होत असल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बुधवार दि 27 रोजी कारखान्यासमोर घोषणाबाजी करत आपल्या मागण्याचे निवेदन कारखाना प्रशासनाला देत या महिण्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक अदा न केल्यास दि 1 जून पासून बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला. परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसोबत संघर्ष समितीचे ॲड. अजय बुरांडे, ॲड.श्रीनिवास मुंडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, हनुमंत सोळंके कॉ.भगवान बडे, रघुनाथ दादा देशमुख हनुमंत लोंढे, कृष्णा कराड , धोंडीबा दिवटे, अशोक शिंदे, दत्तात्रय तिडके, प्रभाकर मुंडे, मनोहर मुंडे, बिभीषण गित्ते,अविनाश मुंडे, शरद गित्ते सूर्यकांत तिडके यांच्या सह अनेक शेतकरी आंदोलक उपस्थित होते.

जिल्ह्यात ऊस गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी 3050 रु सर्वात जास्त ओंकार शुगर्सने दर जाहीर करत पहिला हप्ता 2950 रु व दीपावली सणासाठी 100 रुपये प्रमाणे 2950 प्रमाणे सुरुवातीच्या काळातील काही शेतकऱ्यांचे ऊस बिल अदा केली. नियमानुसार गाळपानंतर पंधरा दिवसात बिल देणे अपेक्षित असताना तीन-चार महिने विलंब केल्याने दि 9 मे रोजी शेतकऱ्यांनी सत्याग्रह आंदोलन पश्चात केवळ 1800 रुपये प्रति टनाप्रमाणे देयक अदा केले. गेले उर्वरित 1150 रुपये हे दि 25 मे पर्यंत संपूर्ण गाळप झालेल्या शेतकऱ्यांना 2950 प्रमाणे पैसे देण्याचं लेखी कबूल केलं. असे असताना सुद्धा अद्याप 1800 रुपये सुद्धा संपूर्ण शेतकऱ्यांना दिले गेले नाहीत.सर्व बाबतीत ओंकार शुगर कडून शेतकऱ्यांची वारंवार दिशाभूल केली जात आहे. नियमानुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर देयके अदा करावीत असे स्पस्ट आदेश असताना नियमाला हडताल पुसणाऱ्या राज्यातील 54 साखर कारखान्यावर साखर आयुक्तांनी सुनावणी घेत कारवाई केली असताना जिल्ह्यातील साखर कारखान्याबाबत राज्यसरकार साखर आयुक्त, जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधी मूक गिळून गप्प का असा प्रश्न शेतकऱ्यांना निर्माण झाला आहे.जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक मिळावीत अशी ठाम भूमिका संघर्ष समितीने घेतली आहे.

## भारतीय शेतीच्या नव्या पर्वाची चाहूल; गांधी, गोयल, अग्रवाल यांची महत्त्वपूर्ण बैठक

### कृषी, बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र बळीराजाच्या उन्नतीसाठी एकत्र

**सिरसाळा (अतुल बडे)**

भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही अनेक आव्हानांशी झुंज देत आहे. उत्पादन वाढत असले तरी उत्पन्नाची हमी नाही, बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची मर्यादा आहे आणि शेतीकडे अजूनही अनेकदा केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनच पाहिले जाते. मात्र आता या पारंपरिक चौकटी मोडून भारतीय शेतीला नव्या आर्थिक क्रांतीच्या केंद्रस्थानी आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, भारतीय स्टेट बँकेचे (SBI) कृषी विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक गोविंद नारायण गोयल आणि मोतीलाल ओसवाल समूहाचे अध्यक्ष रामदेव अग्रवाल यांच्यात एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीचा केंद्रबिंदू होता "भारतीय शेतकऱ्याला



राष्ट्रउभारणीच्या केंद्रस्थानी आणणे".

गांधी, गोयल, अग्रवाल यांच्यात झालेली ही बैठक केवळ औपचारिक चर्चा नव्हती, तर भारताच्या ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्याच्या व्यापक दृष्टिकोनाची सुरुवात मानली जात आहे. या बैठकीनंतर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी म्हणाले की, तळागाळातील प्रत्यक्ष सामाजिक कार्य, संस्थात्मक बँकिंगची ताकद आणि देशातील वित्तीय बाजारपेठेचा अनुभव यांची सांगड घालत भारतीय शेतीला नव्या युगात नेण्याचा निर्धार या बैठकीतून व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमामागे “शेती म्हणजे फक्त उत्पादन नव्हे, तर राष्ट्र निर्मितीचे शक्तिशाली माध्यम” ही भूमिका स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली. आधुनिक वित्तीय नियोजन, बाजारपेठेतील गुंतवणूक, शाश्वत शेती पद्धती, मूल्यवर्धन आणि ग्रामीण उद्योजकता यांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक पटींनी वाढविण्याचा रोडमॅप तयार करण्यावर भर देण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले.

आज भारताला सर्वाधिक गरज आहे ती ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची. कारण खऱ्या अर्थाने विकसित भारताचा मार्ग हा गावातून आणि शेतातूनच जातो. देशातील लाखो शेतकरी आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले, तर भारताचे आर्थिक सार्वभौमत्व अधिक बळकट होईल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला. देश बदलण्याची मोठी स्वप्ने अनेकांनी पाहिली; परंतु ती प्रत्यक्षात उतरवण्यासाठी जल, जमीन, जन आणि अर्थव्यवस्था यांना एकाच ध्येयाने जोडण्याची आवश्यकता असते. हीच दिशा या महत्त्वपूर्ण बैठकीतून स्पष्टपणे पुढे आल्याचे बोलले जात आहे.

## देऊळगाव घाट नरसिंह मंदिरात भव्य एक दिवशीय विष्णू याग सोहळ्याचे आयोजन

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

अधिक मासानिमित्त देऊळगाव घाट येथील श्री नरसिंह मंदिरात एक दिवसीय विष्णुयाग सोहळा गुरुवार दिनांक 28 मे रोजी प्रारंभ होणार आहे.देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथील पवित्र आणि भक्तिमय वातावरणात अधिक मासाच्या पुण्यप्रसंगी श्री नरसिंह मंदिरामध्ये एक दिवसीय भव्य विष्णुयाग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू धर्मामध्ये अधिक मासाला अत्यंत पवित्र आणि पुण्यदायी मानले जाते. या महिन्यात भगवान विष्णूची उपासना, जप, यज्ञ आणि दानधर्म यांना विशेष महत्त्व आहे. याच पवित्र भावनेतून हा धार्मिक सोहळा भक्तांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आयोजित करण्यात येत आहे. श्री नरसिंह मंदिर येथे सकाळी वेदमंत्रांच्या मंगल ध्वनीत विष्णुयागाची सुरुवात होणार असून, या कार्यक्रमासाठी श्रीक्षेत्र मुंगी धाम चे वेधशास्त्र संपन्न गुरुजी प्रवीण महाराज जोशी हे लाभलेले आहेत.वैदिक ब्राह्मणांच्या उपस्थितीत विधीवत पूजा, हवन आणि मंत्रोच्चार संपन्न होणार आहेत. भगवान विष्णू व श्री नरसिंहाच्या कृपेने समाजात सुख, शांती, समृद्धी आणि आध्यात्मिक चेतना वृद्धिंगत व्हावी, हा या यागामागील मुख्य उद्देश आहे. त्यानंतर दुपारी चार वाजता प्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.या कार्यक्रमात हरिनाम संकीर्तन, विष्णुसहस्त्रनाम पठण, भजन, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पुण्यमयी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे गणेश रसाळ ,जयवंत रसाळ ,प्रकाश



रसाळ,व समस्त रसाळ परिवारा तर्फे करण्यात आले आहे. अधिक मास हा आत्मशुद्धी, भक्ती आणि ईश्वरचिंतनाचा काळ मानला जातो. अशा पवित्र काळात आयोजित करण्यात आलेला हा विष्णुयाग भक्तांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करणारा आणि अध्यात्मिक ऊर्जा देणारा ठरणार आहे.

“॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥”
“॥ श्री लक्ष्मी नरसिंहाय नमः ॥”

## काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितीत आज कार्यक्रम



**परळी** :अधिक मासानिमित्त येथील श्री वैजनाथ देवस्थान ट्रस्टच्या वैद्यनाथ प्रवचन मंडप मध्ये गुरुवार दिनांक २८ मे २०२६ रोजी सकाळी 9 ते 11 इष्टलिंग महापूजा त्यानंतर धर्म सभा आणि मुक्तीचा मार्ग या ग्रंथाचे विमोचन सोहळा काशी जगद्गुरु श्री. १००८ डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. धार्मिक कार्यक्रमास सर्व वीरशैव लिंगायत समाजातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त वीरशैव लिंगायत समाज, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे. परळीत कार्यक्रमाच्या तयारीसाठी सोनपेठचे श्री नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत एक बैठक घेण्यात आली. अधिकमासानिमित्त काशी जगद्गुरूं यांच्या उपस्थितीत राज्यात ठिकठिकाणी इष्टलिंग महापूजा , धर्मसभा व ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आलेले आहे या अंतर्गत परळी येथे कार्यक्रमाचे 28 मे रोजी आयोजन करण्यात आले आहे .पालम .गंगाखेड येथून जगद्गुरूंचे परळी शहरात आगमन झाले आहे परळीच्या कार्यक्रमानंतर सोनपेठ येथे कार्यक्रम होणार आहे

## राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त वैजनाथ गल्ली येथे कार्यकारिणी जाहीर

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

लोकमाता, आदर्श राज्यकर्त्या व जनकल्याणकारी कार्यासाठी ओळख असलेल्या अहिल्याबाई होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त वैजनाथ गल्ली येथे जयंती उत्सव कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. परिसरातील युवक, ज्येष्ठ नागरिक व समाजबांधवांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात ही निवड प्रक्रिया पार पडली.

यावेळी जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सचिन बोले यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी आकाश गाडे यांची निवड करण्यात आली आहे. प्रसिद्धी प्रमुख लक्ष्मण बोले,संदीप बोले, रवींद्र काकडे, संतोष कुंडकर, राजेश गवते,अर्जुन बोले,गणेश होळकर ,दत्तात्रय गवते,





तसेच सल्लागार म्हणून शंकर गवते, मुरलीधर कुंडकर, उत्तम काकडे सर, संजय गाडे, चंद्रकांत आव्हाड, रामभाऊ मतकर, रघुनाथ बोले, अनिल बोले, अनंत बोले, विनोद बोले,केरबा कोरे आणि गोपीनाथ काकडे यांची निवड करण्यात आली.

समिती सदस्य म्हणून , बालाजी गवते, बालाजी बोले, सोमनाथ गवते, लक्ष्मण गवते, दिगांबर गवते, नानासाहेब कुंडकर, बालाजी काळे, अरुण साखरे,आप्पासाहेब काळे, पिंटू बोले, राहुल बोले, तानाजी काळे, महेश साखरे, अमर बोले, सतीश गाडे, दत्ता कुंडकर, गणेश जावडे, दिनेश जावडे, अक्षय सरवदे, रोहित बोले, प्रदीप बोले, दीपक बोले, करण बोले, प्रल्हाद होळकर, संतोष बोले, मोहन काळे, सर्जेराव कुंडकर, भागवत गवते, अरुण साखरे, दत्ता गवते, दत्ता बोले, शुभम येडुतकर, राजकिरण काकडे, रोहन रोडगे, विवेक बोले, विजय कुंडकर, रोहन गवते, सचिन मतकर, गौरव बोले, ओंकार बोले, अमित बोले, अमोल बोले आणि वाल्मिक पितळे यांची निवड करण्यात आली आहे.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक ऐक्य, संस्कृती संवर्धन आणि समाजप्रबोधनाचे विविध कार्यक्रम जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारिणीच्या वतीने देण्यात आली. जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.